# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
## वैद्यकीय मुख्य कार्यालय
## सभावृत्तांत

---

दिनांक - १९/१०/२०२० वेळ – दुपारी १.०० वा.

विषय – धन्वंतरी समिती सभेचा सभावृत्तांत...

धन्वंतरी स्वास्थ्य योजना धोरण २०१३ नुसार समितीचे सदस्यांची विविध विषयांवर चर्चा करणेकामी आढावा बैठक सोमवार दि.१९ ऑक्टोबर २०२० रोजी दु.१.०० वा. मा.आयुक्तसो. यांच्या अध्यक्षतेखाली मा.आयुक्तसो. यांचे दालनात आयोजित केली होती.

सदरचे बैठकीस खालील समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

| | |
|---|---|
| १) श्री.श्रावण हर्डीकर | आयुक्त तथा समिती अध्यक्ष |
| २) श्री.अंबर चिंचवडे | अध्यक्ष, पिं.चिं.म.न.पा.कर्मचारी महासंघ तथा उपाध्यक्ष |
| ३) डॉ.पवन साळवे | अति.आरोग्य वैद्य.अधिकारी |
| ४) डॉ.शंकर जाधव | वैद्यकीय अधिक्षक, वाय.सी.एम.एच. |
| ५) श्री.जितेंद्र कोळंबे | मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ६) श्री.आमोद कुंभोजकर | मुख्य लेखा परिक्षक |
| ७) श्री.चंद्रकांत इंदलकर | कायदा सल्लागार, कायदा विभाग |
| ८) श्री.मनोज लोणकर | सह्रा.आयुक्त, प्रशासन |
| ९) श्री.प्रमोद जगताप | कामगार कल्याण अधिकारी |

समितीपुढील मुद्यांवर चर्चा होवून खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला --

| अ.क्र. | विषय | निर्णय |
|---|---|---|
| (१) | श्रीम.संध्या कांबळे यांचे कर्करोगावरील (Breast Cancer) र.रु.२०,००,०००/- पुढील बीलांसाठी मंजुरीबाबत- | श्रीम.संध्या कांबळे यांचे कर्करोगावरील उपचाराचा खर्च मर्यादा ठरविणेकामी त्यांच्या उपचाराबाबत मुंबई येथील टाटा कॅन्सर इन्स्टिटयुटचा अभिप्राय घेण्यात यावा व त्यांना अनुज्ञेय असलेल्या खर्चाबाबत माहिती घेण्यात यावी. |

| | | |
|---|---|---|
| (२) | श्री.प्रतिक राऊत (मयत वाहनचालक) यांचे र.रु.२०,००,०००/- पुढील बीलांसाठी मंजुरीबाबत- | श्री.प्रतिक राऊत यांचे आदित्य बिर्ला व मॅक्स न्युरो रुग्णालयात घेतलेल्या उपचारांची देयकांची तपासणी करुन मग मंजुरीकामी सादर करणेत यावे. |
| (३) | डॉ.माकन हॉस्पिटल, सांगवी यांनी उशिरा सादर केलेल्या देयकांचे अदायगीबाबत- | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेत सहभागी असलेल्या सर्व रुग्णालयांनी रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यापासून तीन महिन्यांच्या आतमध्ये रुग्णाचे बील धन्वंतरी विभागाकडे सादर करणे आवश्यक असल्याचे या रुग्णालयांना पत्राद्वारे कळवावे. तसेच रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यापासून रुग्णालयाने तीन महिन्यांनंतर सादर केलेल्या बीलांसाठी धन्वंतरी दरपत्रकाप्रमाणे मंजूर झालेल्या बीलावर १० टक्के आणि एक वर्षानंतर सादर केलेल्या बीलांसाठी ५० टक्के या प्रमाणे दंड म्हणून वसूल करुन त्यांना बीलाची अदायगी करण्यात यावी. |
| (४) | मनपाचे रूग्णालयामध्ये दाखल झालेल्या अधिकारी/कर्मचा-यांना बाहेरुन आणलेल्या औषधांचे (High End Drugs) आणि Lab tests/Investigation चे बील Covid-19 च्या Government Notification नुसार अदा करणेबाबत - | मनपा रुग्णालयांत दाखल झालेल्या अधिकारी व कर्मचारी यांनी मनपा रुग्णालयांत (न्यू जिजामाता, वायसीएमएच, न्यू भोसरी) उपलब्ध नसल्यामुळे बाहेरुन आणलेल्या औषधांचे (High End Drugs) आणि Lab tests/Investigation चे बीलाची प्रतिपूर्ती धन्वंतरी स्वास्थ्य योजनेतून करणेबाबत सर्व समिती सदस्यांचा अभिप्राय घेऊन त्याचा प्रस्ताव मा.अध्यक्ष, धन्वंतरी स्वास्थ्य योजना समिती यांच्याकडे सादर करावा. त्यानंतर याबाबत निर्णय घेण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| (५) | धन्वंतरी स्वास्थ्य योजनेअंतर्गत वैद्यकीय उपचारांच्या बिलांचा तपशील अवलोकन करुन बिल खर्चास मान्यता देणेबाबत- | सन २०१९-२०२० या आर्थिक वर्षातील अदायगी केलेल्या बीलांची संख्या ४२०२ एवढी असून बील अदायगी केलेली र.रु.१९,८८.७१,४१३/- एवढी आहे. तरी मुख्यलेखापरिक्षक यांनी सविस्तर प्रस्ताव ठेवून प्रशासनाकडून २ वैद्यकीय अधिकाऱ्यांची नेमणूक करुन घेऊन देयकांची सखोल लेखापरिक्षण करुन सविस्तर अहवाल मा.अध्यक्ष, धन्वंतरी स्वास्थ्य योजना समिती यांच्याकडे सादर करावा. |
| (६) | मा.अध्यक्षांच्या परवानगी ऐनवेळचे विषय – श्री.नागनाथ कांबळे यांच्या धन्वंतरी स्वास्थ्य योजनेतील सभासदाबाबत | श्री.नागनाथ आण्णा कांबळे यांचे धन्वंतरी लाभ मिळण्याबाबतच्या अर्जावर प्रस्ताव ठेवणेत यावा. |

यानंतर सर्व उपस्थितांचे आभार मानून बैठकीचे कामकाज संपल्याचे जाहीर करण्यात आले.

कामगार कल्याण अधिकारी
कामगार कल्याण विभाग

कायदा सल्लागार
कायदा विभाग

वैद्यकीय अधिक्षक
यशवंतराव चव्हाण स्मृ. रुग्णालय

सहाय्यक आयुक्त
प्रशासन विभाग

अध्यक्ष
पिंपरी चिंचवड कर्मचारी महासंघ

अति.आरोग्य वैद्य.अधिकारी
वैद्यकीय विभाग

मुख्यलेखापरिक्षक
मुख्यलेखापरिक्षण विभाग

मुख्य लेखा व वित्त अधिकारी
लेखा विभाग

आयुक्त
तथा अध्यक्ष